# पाश्चिमात्य उपायांपेक्षा नैसर्गिक अधिवास राखा!

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

व्हर्टिकल गार्डन, मियावाकी फॉरेस्ट, अर्बन फॉरेस्ट अशा पाश्चात्य, खर्चिक आणि अधिक पर्यावरणीय पदचिन्ह असलेल्या उपायांपेक्षा आपल्याकडेच असलेले नैसर्गिक अधिवास वाचवणे आणि पर्यावरणीय संकल्पनांचा वापर करून त्यांचे नियोजन करणे अधिक फायदेशीर, सोपे आणि स्वस्तही आहे. त्यामुळे स्थानिक जैवविविधतेला मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. केवळ माणसाच्या दृष्टीने विचार न करता इतर सजीवांच्या दृष्टीने भवताल पहिला, तर सहज सोप्या बऱ्याच गोष्टी सुचतील आणि जाणवतील, अशा शब्दांमध्ये नैसर्गिक अधिवास राखण्याचे आवाहन पर्यावरण सल्लागार केतकी घाटे यांनी केले.

'फर्न' पर्यावरण व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशी पुणे येथील 'ऑइकॉस' फॉर इकोलॉजिकल सर्व्हिसेस या मार्गदर्शक संस्थेच्या संस्थापिका आणि व्यवस्थापक केतकी घाटे यांनी 'पर्यावरणीय पुनरुज्जीवन' या विषयावर मार्गदर्शन केले. 'मानवाच्या विकासाच्या चुकीच्या कल्पनांमुळे आज सगळीकडेच नैसर्गिक परिसंस्थांचा ऱ्हास झालेला दिसून येतो. फारच थोड्या ठिकाणी या परिसंस्था मानवी हस्तक्षेपापासून दूर राहिल्यामुळे त्या अखेरच्या घटका मोजत आहेत. येथे त्या त्या ठिकाणी उत्क्रांत झालेली जैवविविधता दिसून येते. बऱ्याचवेळा अशा नैसर्गिक परिसंस्था तुकड्यातुकड्यात अस्तित्वात राहिलेल्या असतात. त्यांचे पुनरुज्जीवन करताना अशा समृद्ध तुकड्यांना जोडणारे कॉरिडॉर विकसित करणे आणि अबाधित राखणे गरजेचे असते, असे घाटे यांनी सांगितले. पर्यावरणीय पुनरुज्जीवन आपण नैसर्गिक क्षेत्र, तसेच ग्रामीण किंवा शहरी भागातही करू शकतो. इथे प्रत्येक ठिकाणी उद्देश वेगवेगळा असतो व त्याच्यानुसार नियोजन करावे लागते. पश्चिम घाट किंवा कोकण येथील आपल्या मालकीच्या एखाद्या जमिनीवर, जी आपल्याला उदरनिर्वाहासाठी गरजेची नसेल अशा ठिकाणी आपण पूर्णतः नैसर्गिक पुनरुज्जीवन आणि तेथील जैव विविधतेचे संवर्धन करू शकतो. आपल्याकडे उपलब्ध वेळ आणि साधनसामुग्रीनुसार टप्प्याटप्प्याने येथील मूळ परिसंस्था तिच्या नैसर्गिक रूपात आणण्यासाठी आपल्याला हातभार लावता येतो', असेही त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागात सार्वजनिक मालकीच्या जमिनींमध्ये गुरांसाठी चांगले गवत लावणे, स्थानिक फळझाडांची बाग, जंगलांसाठी काही भाग राखून ठेवणे, देवरायांचे जतन करणे हे अतिशय गरजेचे आहे. शहरातील नैसर्गिक अधिवास शोधून त्यांना संरक्षण देणे, त्यांना जोडणारे हरितपट्टे विकसित करणे यातूनी आपण उत्तम जैव विविधता जोपासू शकतो, अशी माहिती घाटे यांनी उपस्थितांना दिली.

## केतकी घाटे यांचे व्याख्यानमालेत मार्गदर्शन

